CMYK

बीड । रविवार

२०.०७.२०२५

वर्षे : ५ अंक : ११०

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक • https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# शेतकरी कर्जमाफीवर राज्य सरकारची सर्वात मोठी घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. पावसाळी अधिवेशनानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी स्पष्ट केलं की, 'कर्जमाफी ही तात्पुरता उपाय असतो.

आम्ही आश्वासन दिलंय, ते पूर्ण करूच. मात्र प्रत्येक पाच वर्षांनी कर्जमाफी देणं हे कोणत्याही राज्यासाठी शाश्वत नाही. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी केवळ कर्जमाफी नव्हे, तर दीर्घकालीन





उपाययोजना राबवण्यावर भर दिला. त्यांच्या मते, शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी सरकारने नवा दृष्टिकोन स्वीकारता आहे. मुख्यमंत्री म्हणाले, 'फक्त कर्जमाफी पुरेशी नाही. शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण व्हावे यासाठी राज्य सरकारने एका नव्या समितीची स्थापना केली आहे. ही समिती शेतकऱ्यांसाठी दीर्घकालीन उपायांची शिफारस करणार आहे. यामध्ये शेती उत्पन्न वाढ, खर्च कमी करणे आणि शाश्वत सिंचनाचा समावेश असू शकतो.'

या पत्रकार परिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , अजित पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि इतर नेते उपस्थित होते. अधिवेशनाच्या समाप्तीनंतर घेतलेल्या या पत्रकार परिषदेत सरकारने आगामी योजना स्पष्ट केल्या आणि विरोधकांवरही निशाणा साधला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी जनसुरक्षा विधेयकावर विरोधकांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. विरोधकांनीच संयुक्त समितीत विधेयकाला संमती दिली होती, पण आता वेगळी भूमिका घेत आहेत,' अशी टीका त्यांनी केली. तर उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, 'विरोधक प्रश्नोत्तराच्या तासाला गैरहजर होते. ही संधी त्यांनी गमावली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करत म्हटलं, 'शासन जनतेच्या प्रश्नांवर काम करत आहे. शिक्षक असोत वा अन्य कर्मचारी, त्यांच्या अडचणी दूर करण्यात आम्ही यशस्वी ठरलो आहोत. गेल्या तीन वर्षांपासून विकासाला गती देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. सरकारची भूमिका स्पष्ट असून कर्जमाफीच्या पलीकडे जाऊन ▶▶ उर्वरित पान २ वर

# समाजाच्या सर्वांगीन विकासासाठी शासन कटीबद्ध : राज्यमंत्री नाईक

## गोर बंजारा समाजाच्या एकता मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद ; गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

### राज्यस्तरीय गोर बंजारा भूषण पुरस्काराचे वितरण

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील सर्व समाजाच्या सर्वांगीन विकासासाठी शासन कटीबद्ध आहे. बंजारा समाजाचे देखील विविध प्रश्न आहेत, ते सोडविण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे प्रतिपादन उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी केले. गेवराई येथील भाग्यलक्ष्मी मंगल ▶▶ उर्वरित पान २ वर




# घरकुलसाठी पात्र लाभार्थींनी सेल्फ सर्व्हे करून घ्यावा:आ.संदीप क्षीरसागर

## ग्रामीण भागातील घरकुलच्या सेल्फ सर्व्हेला ३१ जुलैपर्यंत अंतिम मुदतवाढ

**बीड । प्रतिनिधी**

पात्र असलेल्या नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नव्याने घरकूल मिळणार असून त्याकरिता ऑनलाईन सेल्फ सर्व्हे करण्यासाठी ३१ जुलै ही अंतिम मुदतवाढ मिळाली आहे. ३१ जुलै पर्यंत नागरिकांना मोबाईल पद्वारे सेल्फ सर्व्हे करता येणार आहे. त्यामुळे बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड व ▶▶ उर्वरित पान २ वर



### अशाप्रकारे करावा सेल्फ सर्व्हे

सेल्फ सर्व्हे करण्यासाठी आवास प्लस– २०२४ हे शासनाचे अधिकृत प्ले–स्टोअरवरून आपल्या मोबाईलमध्ये इंस्टॉल करावे, नंतर आधार फ स आरडी हे प देखील इंस्टॉल करुन घ्यावे, त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून पवर विचारलेली माहिती भरावी, शेवटी आपल्या कच्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा यांचे फोटो अपलोड करावा, आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा. जर स्मार्टफोन उपलब्ध नसेल किंवा तांत्रिक बाबी हाताळण्यास अडचण येत असल्यास आपल्या गावचे ग्रामसेवक यांच्यामार्फतही सर्व्हे करून घरकुलसाठी अर्ज करता येतो.

# 'विनायक कन्स्ट्रक्शन'ला दिली सर्व शासकीय कामे टेंडर प्रक्रियेतील घोटाळा उघड

## सार्वजनिक बांधकाम विभागाची कंत्राटदारावर कृपादृष्टी

**बीड । प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम विभागा बीडच्या टेंडर प्रक्रियेत गंभीर अपारदर्शकता आणि अनियमितता उघड झाली आहे. सर्व शासकीय इमारतींच्या कामांमध्ये ठरावीक ठेकेदारांना नियमबाह्य पद्धतीने कामे दिली गेली असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केला आहे.

टेंडर प्रक्रिया अपारदर्शक पात्रतेची कसून तपासणी करण्यात आलेली नाही, केवळ तीन एजन्सींनी सहभाग घेतल्याची बाब संशयास्पद, 'विनायक कन्स्ट्रक्शन'ला वारंवार महत्वाची कामे इतर स्पर्धकांना डावलल्याचा आरोप, एचऊकोणत्या खात्यातून भरले याबाबत माहिती अस्पष्ट; बोली क्षमतेची पडताळणीही झाली नसल्याचा आरोप, ठऋद्ध प्रणालीचा वापर करून अपात्र ठेकेदारांना बाजूला करण्याचा प्रयत्न, विनायक कन्स्ट्रक्शनच्या याआधीच्या कामांची गुणवत्ता सुमार असूनही त्यांना पुन्हा कामे देण्यात आली, प्रकल्प अपूर्ण; केवळ ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● सार्वजनिक बांधकाम विभागात टेंडर घोटाळा विनायक कन्स्ट्रक्शनला खास लाभ

**सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत बीड शहरांमध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, २०० खाटाचे रुग्णालय बांधकाम, महसुल विभागाचे निवासस्थान या कामामधे प्रचंड अनियमितता सुरू आहे माहिती अधिकारात माहिती उपलब्ध करून दिली जात नाही. शाखा अभियंता, उप विभागीय अभियंता, कार्यकारी अभियंता यांचे कंत्राटदारासमवेत आर्थिक संबंध असल्याने चक्क टेंडर मॅनेज करत एकाच कन्स्ट्रक्शनला सर्व कामे मिळवून दिली त्यामुळे ते कारवाई करत नाही. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने व्यापक आंदोलन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उभे करण्यात येणार आहे :अजय सरवदे, जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड (प)**

# अंधेरीतील कांदळवनाच्या कत्तलीची तात्काळ दखल; अधिवेशन संपताच पंकजा मुंडे पोचल्या थेट पाहणीला

## अनधिकृत भराव करणाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याचे पर्यावरण मंत्र्यांचे आदेश ;सभागृहात आमदारांना दिलेला शब्द पाळला

**मुंबई । प्रतिनिधी**

अंधेरी पश्चिम येथील लोखंडवाला बॅक रोड परिसरातील कांदळवनाच्या कत्तलीप्रकरणी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी थेट जागेवर जाऊन पाहणी करत गंभीर स्थितीची नोंद घेतली. बेकायदेशीर भराव टाकणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आणि संबंधित जागेवरील भराव हटवून मूळ कांदळवनाची पुनःस्थापना करण्याचेही आदेशही त्यांनी यावेळी दिले.

आमदार अनिल परब यांच्या लक्षवेधी सूचनेनंतर विधानभवनात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करत



अधिवेशन संपल्यावर दुसऱ्याच दिवशी पर्यावरण मंत्री श्रीमती मुंडे संबंधित घटनास्थळी पाहणीसाठी पोहोचल्या. सी.टी.एस. क्रमांक १६१, पहाडी गोरेगाव परिसरात झालेल्या पाहणीत आमदार श्री. परब, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे (एमपीसीबी) सदस्य सचिव अविनाश ढाकणे आणि विविध खात्यांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी बफर झोनमध्ये कोणतीही परवानगी न घेता मोठ्या प्रमाणात भराव टाकल्याचे निदर्शनास आले. प्रत्यक्ष ▶▶ उर्वरित पान २ वर

# राज्यात 357 ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्यांना मिळणार नवीन इमारती

### 'जिल्हा नियोजन'मधून ४५८ कोटी रुपयांची तरतूद - पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत. जिल्हा वार्षिक योजनेतून इमारत बांधकामासह दवाखान्याची दुरूस्ती, स्वच्छतागृह व उपकरण खरेदी यासाठी ४५८ कोटी ४१ लाख ३४ हजार रूपयांची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

पशुसंवर्धनाला कृषी व्यवसायाचा दर्जा देणारे देशातील पहिले राज्य करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यातील पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती देण्याचा निर्णय पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे राज्याच्या सात महसुली विभागातील ३४ जिल्ह्यात एकूण ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत. नवीन इमारत बांधण्याकरिता २८७ कोटी ७६ लाख ४४ हजार तर दुरुस्तीसाठी १२१ कोटी ११ लाख ८२ हजार, स्वच्छतागृह साठी २५ कोटी १७ लाख २० हजार, विविध उपकरणे खरेदीसाठी २४ कोटी ३५ लाख ८८ हजार असा एकूण ४५८ कोटी ४१ लाख ३४ हजार रूपये निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सन २०२५–२६ या आर्थिक वर्षांत जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ही सर्व कामे प्रस्तावित करण्यात येणार आहेत.

### ● बीड जिल्ह्यात २४ इमारतीसाठी ९ कोटी ४० लाख

**बीड जिल्ह्यात सर्व सहा विधानसभा मतदारसंघात २४ इमारतींसाठी ९ कोटी ४० लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात ज्या ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत, त्यांची विभागनिहाय संख्या पुढील प्रमाणे– मुंबई विभाग – ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात १३, पुणे विभाग – पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यात १२५, नाशिक विभाग – नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर जिल्ह्यात ५५, छत्रपती संभाजीनगर विभाग – छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड जिल्ह्यात ५१, लातूर विभाग– लातूर, नांदेड, धाराशिव, हिंगोली जिल्ह्यात ३९, अमरावती विभाग– अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ जिल्ह्यात ३८, नागपूर विभाग– नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यात ३६ अशा एकूण ३५७ ठिकाणी नवीन इमारतींसाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.**




सुसज्ज आरसीसी इमारत भाड्याने देणे आहे

धानोरा रोड जिजाऊ नगर (शिराळेनगर) बीड येथील चार रूम खाली व चार रूम दुसऱ्या मजल्यावर शासकीय कार्यालय किंवा दवाखाना, मुला–मुलींचे वस्तीगृह, विविध कंपन्यांच्या कार्यालयांकरीता अथवा शाळेकरीता दोन मजली सुसज्ज आरसीसी इमारती भाडयाने देणे आहे.

संपर्क
हॉटेल जय महाराष्ट्र

नवनाथ अण्णा शिराळे ९८२२८७५९४५

गोरख आबा शिराळे ९४२२२९५२३०

CMYK

# सर्वोच्च न्यायालयाचा भटक्या कुत्र्यांच्या बाबतीत निर्णय योग्य

भटक्या कुत्र्यांचा भयावह घटना पहाता याचिकाकर्त्यांला सर्वोच्च न्यायालयाने सुनावलेले उत्तर स्वागतार्ह आहे. मानवाच्या रक्षणार्थ भटक्या कुत्र्यांना रस्त्यावर खाऊ घालने अयोग्यच आहे.ज्यांना भटक्या कुत्र्यांची दया येत असेल त्यांनी आपल्या घरात खाऊ घालावे याचे स्वागत सर्वच स्तरातून केल्या जाईल. दया हे मानवीयदृष्टया महान कार्य आहे.परंतु यापोटी भटक्या श्वानांना खाऊ घालण्यावरून एखाद्याचा स्थानिक लोक छळ करीत असतील तर? नेमक्या अशा एका प्रकरणात छळापोटी सर्वोच्च न्यायालयात दाद मागणाऱ्या याचिकाकर्त्यांला सर्वोच्च न्यायालयाने चांगलेच फटकारले व म्हणाले अशा श्वानांना रस्त्यावर खाऊ घालण्यापेक्षा तुम्ही तुमच्या घरी का खाऊ घालत नाहीत?असा सवाल न्यायालयाने केला. नोएडातील एका याचिका कर्त्याच्या सुनावणीमध्ये लावारीस कुत्र्यांच्या बाबतीत याचिकाकर्त्यांच्या वकिलाने म्हटले की प्राण्यांना खाऊ घालण्याच्या कामी आमच्या याचिकाकर्त्यांला त्रास होत आहे आम्ही पशु नियंत्रण नियमांतर्गत काम करीत असुनही आम्हाला का त्रास दिला जात आहे?यावर न्यायालयाने म्हटले की, आम्ही किती रस्ते आणि गल्ल्या पशुप्रेम ीसाठी सोडायच्या? प्रत्येक ठिकाणी प्राण्यांसाठी जागा आहे.माणसांसाठी नाही.तुमच्या सारख्या ज्या लोकांना प्राण्यांचा पुळका असेल त्यांनी आपल्या घरात प्राण्यांसाठी निवासगृह सुरू करावे.सर्वच भटक्या कुत्र्यांना तुम्ही तीथेच खाऊ घाला. तुम्हाला हे करण्यापासून कोणी थांबवणार नाही.देशात भटक्या कुत्र्यांच्या अनेक हुदयात व अंगावर शहारे येणाऱ्या घटना आपण सोशल मीडियाच्या माध्यमातून व वर्तमानपत्रातुन पाहिल्या किंवा ऐकल्या आहेत. अशा परिस्थितीत भटक्या कुत्र्यांवर लगाम कसने काळाची गरज आहे.परंतु काही प्राणी प्रेमी रस्त्यावरील कुत्र्यांना खाऊ घालतात व याचा विपरीत परिणाम सर्वसामान्याना भोगावा लागतो.कारण कुत्र्यांना त्यांच्या वेळेवर खायला भेटले तर ठीक आहे;जर त्यांना वेळेवर जर खायला मिळाले नाही तर ते उग्र रूप धारण करतात.अशा परिस्थितीत पायदळ चालणारे, दुचाकी वाहन चालविणारे, शाळकरी मुले,सायकलस्वार अशांवर आक्रमन करतात व चावा घेण्याचा प्रयत्न करतात आपण चावा घेण्याच्या भयावह घटना वर्तमानपत्राच्या माध्यमातून किंवा मिडियाच्या माध्यमातून पाहिल्या आहेत. त्यामुळे प्राण्यांची सेवा करने वाईट नाही. प्राण्यांची सेवा केलीच पाहिजे परंतु त्यापासून कोणालाही नुकसान होणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे. कारण ते मुके प्राणी आहेत.परंतु त्यांच्यापासून कोणालाही इजा किंवा त्रास होणार नाही हे सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. देशात तब्बल ६ करोड २० लाख भटक्या कुत्र्यांची संख्या आहे. त्यात महाराष्ट्राचा विचार केला तर १२ लाख ७६ हजार भटक्या कुत्र्यांची संख्या आहे.भारतात दरवर्षी कुत्रा चावल्याने २० हजार लोकांचा मृत्यू होतो असे एका अभ्यासात म्हटले आहे.भारतात सध्याच्या परिस्थितीत साप चालण्यापेक्षा कुत्र्याच्या चावण्याने जास्त लोक मरतात. रेबीजमुळे होणारे ३६ टक्के मृत्यू भारतात होतात.यावरून आपण समजू शकतो की कुत्र्यांचा चावा किती भयानक असतो व याचे दुष्परिणाम सर्वांच्याच समोर आहे.प्रशासन कुत्र्यांची नसबंदी कितपत करतात आणि किती सक्सेस होते यावरही प्रश्न चिन्ह उपस्थित होतो. आजही बऱ्याचशा राज्यात भटक्या कुत्र्यांची भयंकर दहशत आहे या पार्श्वभूमीवर सर्वो च्च न्यायालयाचा निर्णय योग्य आणि जनहितार्थ असल्याचे मी समजतो.त्याचबरोबर रस्त्यावर अनेक पशु रोडवर किंवा रोडच्या कडेला बसून असतात कधीकधी दुर्घटनाग्रस्त सुध्दा होतात यावरही सरकारने व स्थानिक प्रशासनाने योग्य ती उपाययोजना करायला पाहिजेत.परंतु रस्त्यावरील कुत्र्यांच्या बाबतीत ज्यांना भावनिक किंवा जास्त काळजी वाटत असेल त्यांनी अशा भटक्या कुत्र्यांची व्यवस्था स्वतः करावी जेणेकरून त्यांचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना होणार नाही.मुक्या जनावरांची सेवा करणे हा मानव धर्म आहे परंतु याचे विपरीत परिणाम व सर्वसाम ान्यांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. देशातील संपूर्ण राज्य सरकारांना विनंती आहे की भटक्या कुत्र्यांच्या भयावह घटना पहाता स्थानिक प्रशासनाच्या वतीने यावर योग्य उपाययोजना करावी.



# ट्रम्प यांच्या हुकुमशाही विरोधात जनता रस्त्यावर

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर येऊन जेमतेम सहा महिने झाले. या सहा महिन्यातच अमेरिकन जनता त्यांना वैतागली असल्याचे दिसून येत आहे. ज्या अमेरिकन जनतेने सहा महिन्यापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना भरभरून मते देऊन राष्ट्राध्यक्ष बनवले तीच अमेरिकन जनता आता त्यांच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहे. विशेष म्हणजे ही आंदोलने फक्त एका शहरात किंवा राज्यात होत आहेत असे नाही तर अमेरिकेतील सर्व शहरात होत आहेत आणि त्यात लाखो अमेरिकन नागरिक सहभागी होत आहेत. नुकतेच स्थलांतरितांना हद्दपार करणे आणि गरिबांसाठी मेडिकेम सुविधा कमी करणे याविरोधात १६०० हून अधिक ठिकाणी अमेरिकन नागरिकांनी निदर्शने केली. आंदोलकांनी या आंदोलनाला गुड ट्रबल लाईव्हज ऑन असे नाव दिले. शिकागो हे या आंदोलनांचे मुख्य केंद्र होते. या आंदोलनात लाखो नागरिक रस्त्यावर जमले. सर्वांनी हातात मेणबत्ती घेऊन मोर्चा काढला. हे आंदोलन शांततेत पार पडले तरी या आंदोलनात आंदोलकांनी ट्रम्प यांच्या विरोधात रोष व्यक्त केला. पब्लिक सिटिझन ग्रुपच्या सह – अध्यक्षा लिसा गिल्बर्ट यांनी सांगितले की आपण आपल्या देशाच्या इतिहासातील भयानक काळातून जात आहोत. सरकारमध्ये वाढत्या हुकूमशाही वृत्तीचा आणि कायद्याच्या उल्लंघनाचा साम ना करत आहोत, जो आपल्या लोकशाही स्वातंत्र्याला आणि अधिकारांना आव्हान देत आहे. या हुकुमशाही प्रवृत्तीविरुद्ध हे आंदोलन आहे. अर्थात ट्रम्प यांच्या हुकुम शाही प्रवृत्तीविरुद्ध अमेरिकन नागरिकांनी केलेले हे पहिलेच आंदोलन नाही. मागील महिन्यातच अमेरिकन नागरिकांनी असेच एक मोठे आंदोलन केले होते. आंदोलकांनी त्या आंदोलनाला 'हॅण्डस ऑफ' आंदोलन असे नाव दिले होते. ते आंदोलन लोकशाहीसाठी असल्याचे सांगितले गेले. त्या आंदोलनात अमेरिकेतील दीडशे पेक्षा जास्त गटांनी सहभाग घेतला होता त्यात सामाजिक हक्क संघटना, कामगार संघटना, एलजीबिटीक्यू प्लस सम र्थक गट, सामाजिक आणि लोकशाहीवादी गटांचा समावेश आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधातील ते आंदोलनही शांततेत पार पडल्याने कोणालाही अटक करण्यात आली नव्हती मात्र त्या आंदोलनाम ुळे अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांची जगभर अप्रतिष्ठा झाली होती. आताही तेच झाले. सह महिन्यांपूर्वी ज्या डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेने सत्तेवर बसवले त्यांच्याच विरोधात जनतेला रस्त्यांवर का उतरावे लागत आहे असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर आहे ट्रम्प यांचा एककल्ली आणि मनमानी कारभार. राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे पण हे निर्णय घेताना त्यांनी अनेकांना दुखावले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी इतर देशातून आयात होणाऱ्या मालांवर भरमसाठ कर लावला आहे. हे करताना त्यांनी अमेरिकेचेच भले होणार असे जनतेला ठासून सांगितले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या




निर्णयाला मेक्सिको, चीन, भारत, कॅनडा या देशांनीही जशास तसे उत्तर देऊन अमेरिकेतून आयात होणाऱ्या मालांवर तितकाच अतिरिक्त कर लावला आहे त्यामुळे जगात व्यापार युद्धाला तोंड फुटले आहे याचा परिणाम जितका जगावर होणार आहे तितकाच तो अमेरिकेवर देखील होणार आहे. या व्यापार युद्धामुळे अमेरिकन बाजारपेठेत मंदी येण्याची भीती तेथील तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. जर अमेरिकेत मंदी आली तर अमेरिकेत महागाई वाढेल त्याचा फटका तेथील सर्वसामान्य नागरिकांनच बसेल त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांचा हा निर्णय तेथील सर्वसामान्य लोकांना पटलेला नाही. केवळ हा एकमेव निर्णय नाही तर गेल्या काही दिवसात ट्रम्प यांनी घेतलेले अनेक निर्णय जनतेच्या पचनी पडले नाहीत त्यात हजारो केंद्रीय कर्मचाऱ्यांची कपात, सामाजिक सुरक्षा व्यवस्थापन कार्यालये बंद करणे, मदत एजेंसी बंद करणे, स्थलांतरितांना हद्दपार करणे, तृतीय पंथीयांच्या कामाच्या संधी कमी करणे, आरोग्य कार्यक्रमांच्या निधीमध्ये कमी करणे हे आणि यासारखे अनेक निर्णय अमेरिकेतील जनतेला पटले नाहीत या निर्णयांना विरोध करण्यासाठीच अमेरिकन जनता रस्त्यावर उतरत आहे. जनतेचा वाढता रोष कमी करण्यासाठी व्हाईट हाऊस पुढे सरसावली आहे मात्र त्याचा आंदोलकांवर कोणताही परिणाम होताना दिसत नाही. आंदोलनाची धग वाढतच चालली आहे. एककल्ली, मनमानी कारभार केला तर जनता ती खपवून घेत नाही हेच या आंदोलनातून अमेरिकन जनतेने दाखवून दिले आहे. हे आंदोलन जर असेच चालू राहिले तर डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेपुढे झुकावेच लागेल आणि आपल्या एककल्ली स्वभावाला मुरड घालून जनतेच्या हिताचे असे सर्वसमावेशक निर्णय घ्यावे लागेल.

पान १ वरून पुढे...

## शेतकरी कर्जमाफीवर...

शेतकऱ्यांसाठी ठोस आणि शाश्वत उपाययोजनांवर भर देण्यात येणार आहे. नवीन समितीच्या शिफारशींवर आधारित योजनांची लवकरच अंमलबजावणी केली जाईल, असंही संकेत देण्यात आले. या पत्रकार परिषदेतून हे स्पष्ट झालं की, कर्जमाफीबाबत सरकार जबाबदारीने निर्णय घेईल आणि दीर्घकालीन धोरणात्मक उपाययोजनांवर लक्ष केंद्रीत करेल. त्यामुळे येत्या काही दिवसांत शेतकऱ्यांसाठी मोठ्या घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## समाजाच्या सर्वांगीन...

कार्यालयात माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त गोर बंजारा समाजाच्यावतीने आयोजित एकता मेळाव्यात ते बोलत होते. याप्रसंगी आमदार विजयसिंह पंडित, मुख्यमंत्री सहायता निधीचे प्रमुख रामेश्वर नाईक, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे सहआयुक्त विजय राठोड, साहेबराव शास्त्री महाराज, सचिन महाराज, चैतन्य महाराज, अमरसिंह पंडित, नाईक फाऊंडेशनच्या डमोहिनीताई इंद्रनील नाईक, उत्तम चव्हाण, प्रा. पी.टी.चव्हाण, बाबुराव जाधव, अण्णासाहेब राठोड, राजेश पवार, सतीश पवार, अनिल राठोड आदींची उपसिवती होती. राज्यस्तरीय बंजारा भूषण पुरस्कार समस्त गोर सम ाजाच्या वतीने देऊन राज्यमंत्री नाईक यांना सन्मानित करण्यात आले. यासह राज्य लोकसेवा आयोग, दहावी, बारावी, अभियांत्रिकी आदी क्षेत्रात प्राविण्य मिळवणाऱ्या गुणवंतांचा राज्यमंत्री नाईक यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला. अमरसिंह पंडित, उत्तम चव्हाण, पी.टी.चव्हाण, रामेश्वर नाईक, साहेबराव शास्त्री, ड मोहिनी नाईक यांनी विचार मांडले. सुरूवातीला माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. दीपप्रज्वलन करून कार्यक्रम ाची सुरूवात झाली. प्रास्ताविक उत्तम चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन राहुल गिरी यांनी केले. गेवराई एमआयडीसीसंदर्भातील बैठक लवकरच गेवराई एमआयडीसीसंदर्भातील बैठक लवकरच घेण्याबाबत पुढाकार घेण्यात येईल, अशी ग्वाही उद्योग राज्यमंत्री नाईक यांनी यावेळी दिली. यासह गावतांड्यावर शासनाच्या विविध कल्याणकारी योजना पोहोचविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असेही त्यांनी सांगितले.

## घरकुलसाठी पात्र...

शिरूर कासार तालुक्यातील ज्या नागरिकांचे सेल्फ सर्व्हे करणे बाकी आहे अशा निकषपात्र नागरिकांनी आपल्या मोबाइलद्वारे किंवा आपल्या ग्रामसेवकामार्फत ३१ जुलै पर्यंत सेल्फ सर्व्हे करून घ्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

पान १ वरून पुढे...

प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी सध्या सद्या सेल्फ सर्व्हे करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी/ ग्रामसेवक यांचे मार्फत किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकता. निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेसाठी सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करून घ्यावी, नोंदणी करण्यासाठी अंतिम मुदतवाढ मिळालेली आहे. ३१ जुलै २०२५ ही शेवटची तारीख असून त्या अगोदरच बीड म तदारसंघातील पात्र नागरिकांनी आपले सर्वेक्षण करुन घ्यावे असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे.

## 'विनायक कन्स्ट्रक्शन...

४५% काम पूर्ण, मुदत संपूनही काम रखडलेल, स्पर्धेअभावी दर कमी मिळू शकले असते, मात्र शासनाच्या तिजोरीला लाखो रुपयांचा फटका.

सदर प्रकरणी या मागण्या केल्या आहेत संपूर्ण टेंडर प्रक्रियेची स्वतंत्र चौकशी तज्ञ समितीकडून व्हावी, एचऊट्रान्सफर, इखऊ क्षमता व ठत्रद्ध प्रणालीची चौकशी करावी, विनायक कन्स्ट्रक्शनच्या सर्व प्रकल्पांची लेखा व गुणवत्ता तपासणी करावी, भावी टेंडर प्रक्रिया पारदर्शक, खुली आणि स्पर्धात्मक ठेवावी, मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता यांची सखोल चौकशी करावी अशी सविस्तर तक्रार वंचितचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजीनगर, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ धाराशिव यांच्याकडे केली आहे.

## अंधेरीतील कांदळवनाच्या...

दर्शनी नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्याचे सांगून ही जागा काही वर्षांपूर्वी नॉन डेव्हलपमेंट झोनमध्ये होती. ती डेव्हलपमेंट झोन कशी झाली?, असा थेट सवाल करत श्रीमती मुंडे यांनी विभागाला जमीन नॉन डेव्हलपमेंट झोन असण्याची कारणे काय होती याचा तपशीलवार शोध घेण्याचे आदेश दिले. तसेच, जे कंत्राटदार बेकायदेशीर भरावासाठी जबाबदार आहेत, त्यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले. संबंधित ठिकाणी भराव हटवून मूळ कांदळवनाची पुन:स्थापना करण्याचेही आदेशही त्यांनी यावेळी दिले. कांदळवनाची कत्तल करून मोठ्या प्रमाणात अतिक्रमण सुरू असल्याच्या तक्रारी लक्षात घेता, अशा सर्व प्रकरणांचे संकलन करून तात्काळ कारवाई करण्याच्या सूचनाही पर्यावरण मंत्री श्रीमती मुंडे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. हे प्रकार थांबायला हवेत, पर्यावरणाच्या रक्षणासाठी यंत्रणांनी जलद गतीने काम केले पाहिजे, असे श्रीमती मुंडे यांनी स्पष्टपणे नमूद केले.

पान ४ वरून पुढे...

## सौ. मंगलाताई....

महाविद्यालयात दि. २० जुलै रोजी सकाळी १०. ०० वा. रक्तदान शिबीर, होणार आहे तर द...अदर वर्ल्ड नाट्यप्रयोग सायं. ६.०० वाजता होणार आहे. दि. २१ जुलै रोजी सायं. ६.०० वाजता गझल संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असुन माजलगावकरांसाठी पर्वणीच ठरणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी डॉ. प्रकाश आनंदगावंकर हे तर प्रमुख पाहुण्या म्हणुन राजश्रीताई हेमंत पाटील, आमदार प्रकाशदादा सोळंके यांची उपस्थिती असणार आहे तर मा. आ. मोहनराव सोळंके, मा. आ. राधाकृष्ण होके पाटील, मा. आ. बाजीराव जगताप, डॉ. आर. जी. बजाज, बहुजन नेते बाबुराव पोटभरे, चेअरमन विरेंद्र प्रकाशदादा सोळंके, व्हा. चेअरमन जयसिंग धैर्यशिलकाका सोळंके यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास माजलगावकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे यांनी केले आहे.

## शिक्षणासाठी जीव...

कसरत हे विद्यार्थी निमूटपणे सहन करत आहेत. शासन शिक्षणावर कोट्यवधी रुपये खर्च करत असताना एवढ्याशा सुरक्षित रस्त्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी कानाडोळा का केला आहे, असा संतप्त सवाल पालक उपस्थित करत आहेत. शाळा हाकेच्या अंतरावर असूनही, आमच्या लेकरांना प्राणाशी खेळत रस्ता ओलांडावा लागतो. उद्या एखादी दुर्घटना झाली, तर जबाबदार कोण? असा प्रश्न त्यांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेवर उपस्थित केला आहे.

## डॉ. लोकशाहीर अण्णाभाऊ...

कमलाकर हातागळे, विलास अंकल सुतार, माजी नगराध्यक्ष ब्रह्मदेव धुरंधरे, माजी नगरसेवक भरत गायकवाड , ड. सोमेश्वर कारके संतोषजी सुतार, दीपक नाना सुतार ,विजय दादा सुतार , प्रदीप सुतार ,रजनीकांत सुतार, विशाल जिजा थोरात , मायकल सुतार ,रणजीत सराटे ,राहुल सुतार , तीर्थराज धुरंधरे, प्रदीप कांबळे , विनोद कांबळे, राणू कानडे, अक्षय पवार, बल्ली भैया शिंदे, राजेंद्र सुतार , सुभाष सुतार, अमोल सुतार अमोल मधुकर सुतार, बाळराजे थोरात, बंडू पवळे , विकास कारके इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

## बीडमध्ये एमपीडीए...

स्वतःचे अस्तित्व लपवून वावरत होता.

अखेर पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. संदीप पाटील, स्थागुशा बीडचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, उपनिरीक्षक सिद्धेश्वर मुरकुटे यांच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे सुरज ढाकणे याला मुंगी फाट्यावर १८ जुलै २०२५ रोजी रात्री अटक केली. यानंतर त्याला कडक पोलीस बंदोबस्तात १९ जुलै रोजी पहाटे १.१५ वाजता छत्रपती संभाजीनगर येथील हसुल कारागृहात दाखल करण्यात आले.

ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय अधिकारी निरज राजगुरु, पोनि बंटेवाड, स.पो.नि संदीप पाटील, स.पो.नि नारायण एकशिंगे, स.पो. नि अनंता तांगडे, तसेच संपूर्ण चकलांबा पोलीस व स्थागुशा बीड पथकाच्या समन्वयातून यशस्वीपणे पार पडली.

## विद्यार्थ्यांनी आपल्या...

सेवाभावी संस्था चांदेगाव ), प्रा डॉ. गोपाळराव धांडे (क्रीडा शिक्षक) यांची उपस्थिती होती. हे सर्व मान्यवर विद्यार्थ्यांना आय टी क्षेत्रात उपलब्ध संधीवर दिवसभर मार्गदर्शन करणार आहेत. पुढे बोलताना श्रीकांतजी डिसले म्हणाले की, आपली दिशा निश्चित असली तर आपल्याला योग्य मार्ग निवडता येतो. आपला आत्मविश्वास म हत्त्वाचा असून स्वयंप्रेरणा देखील तितकीच महत्त्वाची आहे. आजच्या स्पर्धेचे युगामध्ये स्वतः जागृत ठेवून ज्ञान संपादन केले पाहिजे असेही ते म्हणाले.

यावेळी अध्यक्षीय समारोप करताना मा रमेशभाऊ पोकळे यांनी , विद्यार्थ्यांनी आपला आयडॉल कोणाला बनवावा, आपल्या जीवनाची ध्येय कशी ठरवावीत याविषयी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांचे प्रयत्न, जिद्द, चिकाटी बरोबरच कौशल्य असणाऱ्या शिक्षणाची निवड केली तरच वैश्विक पातळीवर उपलब्ध असणाऱ्या विविध क्षेत्रातील चांगल्या संधी मिळू शकतात असे सांगितले.

विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेले पुणे येथील उद्योजक मा तेजसजी शिंदे यांनी, चांगल्या क्षेत्रात संधी मिळवण्यासाठी महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना करिअरच्या संदर्भात विशेष मार्गदर्शन आवश्यक बनले आहे. राष्ट्रीय– आंतरराष्ट्रीय पातळीवर रोजगाराच्या नवनवीन क्षेत्रातील संधी उपलब्ध असूनही माहितीच्या अभावी ग्रामीण भागातील विद्यार्थी तिथ पर्यंत पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे असे रोजगार विषयावरील मेळावे व कार्यशाळा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरवून रोजगाराच्या संधी मिळवण्यात विद्यार्थ्यांना यश मिळू शकते असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्तावित महाविद्यालयाचे प्राचार्य सय्यद आर डी यांनी केले. रोजगाराच्या चांगल्या संधी मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी कौशल्यपूर्ण आणि प्रतिभासंपन्न बनने आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व उद्घाटन सत्राच्या कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक बापूसाहेब शिंदे यांनी मानले.

या कार्यशाळेत बीड शहरातील बी. सी. ए., बी. सी. एस., पॉलिटेक्निकल, इंजिनियरिंग महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. त्याचबरोबर अन्य महाविद्यालयातील प्राध्यापक, प्लेसमेंट ऑफिसर्स हे देखील या कार्यशाळेत सहभागी झाले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

CMYK
दैनिक मराठवाडा पत्र | संमिश्र | रविवार, दि. २० जुलै २०२५ | पान ३

# लिंबागणेश येथे विद्युत मोटार पंप चोरांचा सुळसुळाट नेकनुर शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण

**●नेकनुर पोलिस प्रशासनाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष : डॉ.गणेश ढवळे**

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश परीसरात काही महिन्यांपासून छोट्या मोठ्या भुरट्या चो-या, विद्युत मोटारी चोरणे,रोहित्राचे वायर चोरी अशा घटना घडत असुन गेल्या ६ महिन्यात २२ विद्युत मोटार चोरीच्या घटना घडुन संबंधित प्रकरणी पोलिस प्रशासनाला तक्रारी करूनही पोलिस प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला असुन शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे . गेल्या पंधरा दिवसात दोन वेळा विद्युत मोटार वायरच्या चोरीची घटना घडलेल्या मुळेवस्ती वरील शेतकरी रामदास मुळे यांनी विहीरीत पाणी असुन पिकांना पाणी देता येईना झाले तर जनावरांबरोबरच माणसांच्या पिण्याच्या पाण्याची अडचण असल्याची संतप्त प्रतिक्रिया दिली. याचवेळी लिंबागणेश येथील सामाजिक कार्यकर्ते विक्रांत वाणी यांनी ३ महिन्यांपूर्वी विद्युत मोटार,पेटी आणि वायर चोरीची घटना घडल्याची लेखी तक्रार नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनी चंद्रकांत गोसावी यांना दिल्यानंतर त्यांनी फिर्याद घेतली नसुन वारंवार पाठपुरावा करूनही तपास झालाच नसल्याने नेकनुर पोलिस स्टेशन जाणिवपूर्वक दुर्लक्ष



करत असल्याचा आरोप केला आहे. पावसाने ओढ धरल्याने दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर असतानाच शेतकरी उपयोगी साहित्य चोरीच्या वाढत्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असुन चोरट्यांवर लगाम लावण्यासाठी पोलिस प्रशासनाने कठोर उपाययोजना करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

मोटार वायर चोरीमुळे विहीरीत पाणी असुन पिकांना देता येईना; माणसांबरोबरच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची अडचण : रामदास मुळे ; डिगांबर मुळे (शेतकरी)

लिंबागणेश येथील मुळे वस्तीवरील रोहित्रांवर जवळपास २० शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन असुन गेल्या १५ दिवसांत मोटार वायर चोरीच्या घटनाची हि दुसरी घटना असुन माझ्या विहिरीवरील १५०० फुट वायर, विद्युत पेटी असा एकुण ३० हजार रुपयांहून अधिक नुकसान झाले आहे. त्यामुळे याचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी रामदास मुळे, डिगांबर मुळे,सूदाम मुळे, सुभाष मुळे,रामराजे मुळे, अशोक मुळे, नवनाथ मुळे ,प्रकाश मुळे यांनी केली आहे.

नेकनुर पोलिस प्रशासनाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष ; सपोनी गोसावी यांनी फिर्याद सुद्धा घेतली नाही : विक्रांत वाणी ( सामाजिक कार्यकर्ते)

लिंबागणेश परीसरात गेल्या ६ महिन्यात २२ पेक्षा जास्त विद्युत मोटार पंप आणि वायर चोरीच्या घटना घडल्या आहेत. ३ महिन्यांपूर्वी माझ्या शेतातील विद्युत मोटार पंप, पेटी आणि वायर मिळुन २० हजारांचा ऐवज लंपास झाला होता. नेकनुर येथे सपोनी चंद्रकांत गोसावी यांना मोटार चोरणारांच्या टोळीची नावे सांगुनही त्यांनी माझी फिर्याद घेतली नाही.वारंवार पाठपुरावा करूनही तपासाच्या नावाखाली टोलवाटोलवी सुरू असुन नेकनुर पोलिस स्टेशनचे अधिकारी जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत त्यामुळे चोरीच्या घटनात वाढ होत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते विक्रांत वाणी यांनी केला आहे.

लिंबागणेश परीसरात दुबार पेरणीचे संकट उद्भवले असतानाच शेतातील पाणबुडी, विद्युत मोटारी, वायर आदी शेतकरी उपयोगी साहित्य चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांसमोर नवं संकट उभे राहिले. यामुळे शेतकरी वर्गामध्ये चिंतेचे वातावरण असुन पोलिस प्रशासनाने चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेत माईलस्टोनच्या सात विद्यार्थ्यांचे यश, अनुष्का भिसे स्कॉलरशिप साठी पात्र

**बीड । प्रतिनिधी**

माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल, दत्तनगर तळेगाव येथील विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप परीक्षेत उत्तम कामगिरी करत शाळेचे नाव उज्वल केले आहे. इयत्ता ५ वीतील १० विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला होता. त्यापैकी तब्बल सात विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून अनुष्का भिसे शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी पात्र ठरली आहे.

स्कॉलरशिप परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थीमध्ये अनुष्का भिसे, आयुषी कुलकर्णी, रुद्र मोहिते, आरोही कदम, चैतन्य काकडे, शौर्य मस्के आणि यश बनसोडे. यापैकी अनुष्का भिसे हिने उल्लेखनीय कामगिरी करत शिष्यवृत्ती पात्रता मिळवली आहे. संचालक ज्ञानेश्वर तांबे यांच्या हस्ते अनुष्का भिसे हीचा सत्कार करण्यात आला. यावेळी ज्ञानेश्वर तांबे म्हणाले की, आमच्या शाळेचा उद्देश केवळ पुस्तकी ज्ञान मर्यादित न ठेवता, विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी



सज्ज करणे हाच आहे, या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले. अनुष्का भिसे सह इतर विद्यार्थ्यांचे अभिनंदन संचालक नम्रता तांबे, प्रिन्सिपल सारिका जगताप, शिक्षक अमोल क्षीरसागर, सत्यजित ठाकूर शिक्षिका माधुरी तांबे, अर्चना जोगदंड, स्वाती भांडवलकर, सुषमा पवार, अर्चना गोरे, जयश्री राऊत व पालकांनी केले.

## मंगलाताई सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा

**माजलगावकरांसाठी सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची पर्वणी**

**माजलगाव । प्रतिनिधी**

शिक्षण, मातृत्व आणि नेतृत्व यांचे प्रतीक असलेल्या सौ. मंगलाताई प्रकाशदादा सोळंके यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त माजलगाव येथे एक भव्य अभिष्टचिंतन सोहळा आणि सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन २० व २१ जुलै २०२५ रोजी करण्यात आले आहे. सविस्तर वृत्त असे की, २० जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम लोकनेते सुंदररावजी सोळंके महाविद्यालय,माजलगाव येथे संपन्न होणार आहे.या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ डॉक्टर डॉ. प्रकाशराव आनंदगावकर असतील. तर प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती राजश्रीताई हेमंत पाटील (अध्यक्ष, गोदावरी समूह, नांदेड) यांची उपस्थिती लाभणार आहे. या वेळी मा. आ. प्रकाशदादा सोळंके (आमदार, माजलगाव विधानसभा), मा.मोहनरावकाका सोळंके( माजी आमदार), मा. मा. राधाकृष्ण अण्णा होके पाटील( माजी आमदार), मा. बाजीराव भाऊ जगताप ( माजी आमदार), बाबुराव पोटभरे,आर.जी.बजाज,



मा. जयसिंग सोळंके, मा. विरेंद्र सोळंके आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमातील सत्कारमूर्ती सौ. मंगलाताई प्रकाशदादा सोळंके या माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा असून मराठवाड्यात अनाथांची माऊली अशी त्यांची ओळख आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव या प्रसंगी करण्यात येणार आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान लक्षणीय आहे. या कार्यक्रमात सकाळी १० वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करून समाजसेवेचा एक महत्वपूर्ण संदेश देण्यात येणार आहे. संध्याकाळी ६ वाजता थिएटर ऑफ रेलेव्हन्स तर्फे द अदर वर्ल्ड हा मराठी नाट्यप्रयोग सादर होणार आहे. तसेच २१ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता गझल संध्या या गझल गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. दुर्गेश सोनार (मुंबई) असतील तर दत्तप्रसाद जोग, अमिता पैठणकर, आबेद शेख, आत्माराम जाधव, अविनाश काठवटे असे नामांकित गझलकार उपस्थित राहणार असून या कार्यक्रमाचे निवेदन सुप्रसिद्ध कवी प्रभाकर साळेगावकर हे करणार आहेत. आयोजनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील म ान्यवर एकत्र येणार असून, समाजसेवेचा आदर्श ठरलेल्या मंगलाताई सोळंके यांच्या कार्याचा गौरव करण्याचा हेतू आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन संयोजन समितीकडून करण्यात आले आहे.

## वसंतराव नाईक विद्यालयाचा विद्यार्थी विश्वजीत घुमरे शिष्यवृत्ती परीक्षेत तालुक्यातून सर्वप्रथम

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरातील नामांकित असलेल्या वसंतराव नाईक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी चि. विश्वजीत नवनाथ घुमरे याने महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद आयोजित इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षा २०२५ मध्ये झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत पाटोदा तालुक्यातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद पुणे आयोजित इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षा नुकतीच संपन्न झालेली होती या परीक्षेचा निकाल गत महिन्यात जाहीर झाला होता मात्र गुणवत्ता यादी दिनांक १० जुलै २०२५ रोजी जाहीर झाली या जाहीर झालेल्या यादीमध्ये व या परीक्षेमध्ये वसंतराव नाईक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी विश्वजीत नवनाथ घुमरे यांनी तालुक्यामधून सर्वप्रथम तर जिल्हा पातळीवर आठव्या क्रमांकाने तर राज्य



पातळीवर अकराव्या क्रमांकावर स्थान मिळविले आहे. विश्वजीत नवनाथ घुमरे यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत असून यामध्ये नवनिर्माण शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव रामकृष्णजी बांगर, मार्गदर्शिका सौ सत्यभामाताई बांगर, युवा नेतृत्व तथा नवनिर्माण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विजयसिंह बाळा बांगर, विद्यालयाचे प्राचार्य तुकाराम तुपे पर्यवेक्षक संजय राख शिष्यवृत्ती विभाग प्रमुख संतराम राजगुरू स्पर्धा परीक्षा प्रमुख एम आर नागरगोजे व विद्यालयातील सर्व शिक्षकांनी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गौतम वाघमारे सेवानिवृत्त; लिंबागणेशकरांकडून भव्य सत्कार

**३३ वर्षांची निष्ठावान सेवा ४३ पदकांनी सन्मानित सर्वांचे लाडके ‘वाघमारे भाऊ’**

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड पोलीस खात्यात ३३ वर्षे कर्तव्यनिष्ठ, शिस्तबद्ध आणि समाजाभिमुख सेवा बजावणारे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गौतम भानुदास वाघमारे दिनांक ३० जून २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. लिंबागणेश परिसरात



तसेच पंचक्रोशीत ‘वाघमारे भाऊ’ या नावाने परिचित असलेल्या या व्यक्तिमत्त्वाने आपल्या कार्यकाळात अविस्मरणीय ठसा उमटवला. त्यांनी बीड शहर पोलीस ठाणे, बीड ग्रामीण, नेकनूर, गेवराई, वडवणी तसेच लिंबागणेश पोलीस चौकी येथे प्रामाणिक सेवा बजावली. त्यांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेचा गौरव म्हणून ४३ पदकांनी त्यांना सन्मानित करण्यात आले, ही बाब त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष आहे. वाघमारे भाऊंच्या सेवेचे वैशिष्ट्य म्हणजे – मानवी मूल्यांची जपणूक, संघर्षमय कुटुंबांना आधार, तसेच निर्दोष नागरिकांना न्याय मिळवून देणे. त्यांच्या कार्यकाळात एकाही निर्दो ष व्यक्तीवर खोटा गुन्हा दाखल झाला नाही. या बाबत बोलताना डॉ. गणेश ढवळे म्हणाले, वाघमारे भाऊ म्हणजे सत्याला सत्य आणि खोट्याला खोटं ठामपणे सांगणारे अधिकारी. त्यांनी कधीही कोणाची पिळवणूक केली नाही. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातही ते आदर्श ठरले. त्यांच्या तीन म ुलांपैकी एक वकील, एक डॉक्टर आणि एक प्राध्यापक झालेला आहे. ही त्यांच्या संस्कारांची आणि शिक्षणातील मूल्यांची फलश्रुतीच आहे.

## प्राचार्य डी.जी.तांदळे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर बचाव मंच परिवाराचे प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डी.जी. तांदळे सर (दादा) यांचा ७० वा वाढदिवस बीड शहर बचाव मंचच्या वतीने शहरातील विविध क्षेत्रातील यशस्वीपणे कार्य करणाऱ्या म ान्यवरांकडून मोठ्या उत्साहाने शहरातील राजाभाऊ वंजारे, छायाताई सरोदे, अभिजीत वैद्य संचलित ‘जिव्हाळा’ बेघर निवारा केंद्र परिवारासमवेत साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांनी सोबत काम करताना आलेले अनुभव व जुन्या नव्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी डी. जी. दादांनी आयुष्यभर केलेल्या कार्यावर सर्वांनी प्रकाशझोत टाकून मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या तसेच त्यांच्या उदंड आयुष्याची ईश्वरचरणी कामना केली. उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांनी मोठ्या सन्मानाने आदरपूर्वक सत्कार करत डी. जी. दादांना मनःपूर्वक भरभरून हार्दिक शुभेच्छा देऊन त्यांचा ७० वा वाढदिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला. कॉम्रेड नामदेव चव्हाण, राजकुमार कदम, बीड शहर बचाव मंचाचे अध्यक्ष नितीन जायभाये, पत्रकार बालाजी जगतकर, व जेष्ठ सम ाजसेवक मुकरमजानभाई पठाण, मंचचे कायदेशीर सल्लागार ॲड. अनिलजी बारगजे, ॲड. नितीनजी वाघमारे, (इस्लामपुरा) माजी नगरसेवक फारूक सय्यद, आ.प.चे जि. अ.अशोकराव येडे, इंटक कॉंग्रेसचे जि. अ. रामधनभाऊ जमाले, सेवानिवृत्ती पीएसआय बाबासाहेब जायभाये, वाहतूक नियंत्रण विभागाचे पोलीस उपनिरीक्षक वासुदेव मिसाळ, कृषी विभागाचे बाबासाहेब कोकाटे, मातोश्री विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. डी. नागरगोजे, सेवानिवृत्त चौरे सर, सिटी हॉटेल ग्रुपचे परवेज कुरेशी, आप तक न्यूज चॅनलचे संचालक इमरोज भाई शेख , गोंधळी समाजाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रभाऊ काटे आदी मान्यवर शुभेच्छुक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विजय साळवे हजारो कार्यकर्त्या समवेत रिपब्लिकन सेनेत सामील

**माजलगाव । प्रतिनिधी**

बुद्ध शिव फुले शाहु डॉ आंबेडकर यांच्या विचारधारेचा वसा आणि वारसा जोपासत बीड जिल्ह्यातील दलित चळवळीचे नेतृत्व करणारे विजयदादा साळवे यांनी आपल्या हजारो कार्यकर्त्या समवेत रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी मा. आनंदराज आंबेडकर यांच्या नेत्रत्वाखाली रिपब्लिकन सेनेत जाहिर प्रवेश केला आहे.

बीड जिल्ह्यातील गोरगरीब दलित जनतेच्या समस्या सोडवसाठी गेली तिन दशकापासून निस्वार्थपणे सदैव रस्त्यावर उपलब्ध असणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचे खंदे समर्थक तथा जातीपातीचे राजकारण न करता सर्वांसोबत मैत्रीचे संबंध ठेवून बहुजन सम ाजाला विश्वासात घेऊन योग्य दिशा देणारे सर्वसमावेशक समाजसेवक विजयदादा साळवे यांनी बीड जिल्ह्यातील आपल्या हजारो कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन दिनांक १६ जुलै २०२५ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन



दादर येथील मुख्य कार्यालयात आनंदराज आंबेडकर साहेब यांच्या नेत्रत्वाखाली रिपब्लिकन सेनेत जाहिर प्रवेश केला असल्याची माहिती विजय साळवे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे

CMYK

दैनिक ● https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

रविवार, दि.२० जुलै २०२५ पान ४

## सौ. मंगलाताई प्रकाशदादा सोळंके यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यास उपस्थित रहा: सभापती जयदत्त नरवडे



माजलगाव । प्रतिनिधी

सोहळा दातृत्वाचा, मातृत्वाचा आणि नेतृत्वाच्या अभिष्टचिंतनाचा हे ब्रिद वाक्य घेवुन सौ. मंगलाताई प्रकाशदादा सोळंके यांच्या ७० व्या वाढदिवसानिमीत्त अभिष्टचिंतन सोहळा व सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असुन या होणा–या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे यांनी केले आहे. सौ. मंगलाताई प्रकाशदादा सोळंके यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमीत्त लोकनेते सुंदरराव सोळंके ▶▶ उर्वरित पान २ वर



## धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांवरील अन्याय कदापि सहन करणार नाही : मीनाक्षी देवकते

### तुलसी इंग्लिश स्कूलच्या धनगर समाज विद्यार्थी वस्तीगृहाचा आदर्श इतर शाळेने घ्यावा

बीड । प्रतिनिधी

धनगर समाजाच्या सामाजिक कार्यकर्त्या अहिल्या महिला आघाडीच्या प्रदेश सचिव मीनाक्षी देवकते डोमाळे यांनी दिनांक१३/७/२०२५ रोजी तुलसी इंग्लिश स्कूल येथील धनगर समाजाच्या विद्यार्थिनींसाठी असणाऱ्या वस्तीगृहामध्ये भेट दिली. त्यावेळी त्या प्रथम मुलींच्या वस्तीगृहात व नंतर मुलांच्या वस्तीगृहासाठी भेट देण्यासाठी गेल्या त्यांनी सर्व सुविधा त्यामध्ये स्वच्छता, जेवणाची, त्यांच्या राहण्याची व्यवस्था यांची तपासणी केली. एवढेच नव्हे तर स्वतः जेवण पण तिथेच केले.

बीड जिल्ह्यामध्ये जेवढे इंग्लिश धनगर समाजाच्या स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह आहेत, तेवढ्या सगळ्या वस्तीगृहांना आणि शाळेला अचानक कुठलेही दिवशी भेट दिली जाणार आहे.

ज्या शाळेमध्ये धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना निधी वापरला जात नाही, त्या शाळेची तात्काळ जिल्हाधिकारी, गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे आणि धनगर समाजाच्या मुला मुलींसाठी वस्तीग्रह समिती स्थापन केलेली आहे त्यांच्याकडे तक्रार दिली जाणार. बीडमधली पहिले वस्तीगृह मुलींचं तपासले आहे. तिथे आम्हाला सर्व व्यवस्थित वाटले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते माऊली शिरसाट, सोनवणे मॅडम, जायभाय मॅडम आणि काही पालक यावेळी उपस्थित होते.

## राजुरीत देशी-विदेशी दारु अड्ड्यांवर छापे

बीड । प्रतिनिधी

ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या राजुरी (न) मधील दारूच्या अड्ड्यांवर छापा मारून लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे व स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस कर्मचाऱ्यांनी या कारवाया केल्याचे कळते. पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंद्यावर कठोर करावायांच्या सूचना दिलेल्या असताना राजुरीमध्ये दारूची विक्री जोरात सुरु होती. हातभट्टीचे अड्डे सुरु असल्याचे पोलिसांना कळल्यानंतर पहाटे ५ वाजल्यापासून राजुरीतील सहा ठिकाणी छापा मारण्यात आले.या कारवाईत ४ लाखांच्या देशी-विदेशी दारू जप्त करण्यात आली असून हातभट्टी दारूचे अड्डे उद्धवस्त करण्यात आल्याचे कळते.या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे, स्थानिक गुन्हे शाखेतील आनंद मस्के, नामदेव सानप, दादा सानप, बळीराम राठोड,पठाण, चालक पवार यांचा समावेश होता.

## शिक्षणासाठी जीव धोक्यात घालून करावा लागतो विद्यार्थ्यांना प्रवास



किल्ले धारूर । प्रतिनिधी

शिक्षणासाठी जीव धोक्यात घालून विद्यार्थ्यांना प्रवास करावा लागतो पालकांना आमचं मूल शाळेतून परत येईल का नाही हा प्रश्न दररोज भंडारे वस्तीवरील पालकांच्या मनात घर करून असतो. कारण त्यांची मुलं जिल्हा परिषद शाळेत पोहोचण्यासाठी ज्या मार्गाने जातात, तो मार्ग नाहीच, तो एक मोठा ओढा आहे, घनदाट झाडी आणि चिखलाने भरलेली वाट ! धारूर तालुक्यातील धुनकवड क्र. २ येथील जिल्हा परिषद शाळेत जाण्यासाठी भंडारे वस्तीतील जवळपास २० विद्यार्थ्यांना दररोज या धोकादायक मार्गाचा सामना करावा लागतो. विशेषतः पावसाळ्यात हा ओढा पुराच्या पाण्याने भरून वाहतो आणि या विद्यार्थ्यांसाठी शाळा म्हणजे जीवावरचा खेळ ठरत असून गेल्या अनेक महिन्यांपासून ही जीव घेणी ▶▶ उर्वरित पान २ वर

## धाकलगाव, गेवराई ते चाकरवाडी पायी दिंडीत भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे :अंबादास गिरी

### ● माऊली ग्रुपच्या पायी दिंडीचे आयोजन

गेवराई । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून धाकलगाव, गेवराई, येथील माऊली भक्त आषाढ महिन्यांत धाकलगाव, गेवराई ते चाकरवाडी अशी पायी दिंडीचे आयोजन करण्यात येत असून याही वर्षी आज दि.२० जुलै रोजी पायी दिडी निघणार आहे तरी या दिंडीत सहभागासाठी माऊली भक्तांनी ८६६९०९२०९४ या मोबाईल नबंरवर संपर्क साधून धाकलगाव, गेवराई ते चाकरवाडी पायी दिंडीत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान माऊली भक्त अंबादास गिरी, विठ्ठल जगदाळे,वादे, दशरथ गावडे, बळीराम उडें, अशोक बीडे, यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात केले आहे

दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात ते म्हणाले की गेली अनेक वर्षांपासून धाकलगाव, गेवराई ते चाकरवाडी पायी दिंडीचे आयोजन माऊली ग्रुपच्या वतिने करण्यात येत असून या दिंडीत मोठ्या प्रमाणात सहभाग



घेत असतात तसेच धाकलगाव, शहागड, गेवराई, गढी,राजणी, पाडंळसिगी,हिरापुर,पेडगाव, बीड , कपिलधार, माजंरसुबा नेकनुर, मर्गे चाकरवाडी या मार्गे पायी दिंडी काढण्यात येत असते तरी ज्या माऊली भक्तांना दिडीत सहभागी व्हायचे आहे त्यांनी अंबादास गिरी यांच्या ८६६९०९२०९४ या मोबाईल नबंरवर संपर्क साधून दिंडीत मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे असे आव्हान अंबादास गिरी, विठ्ठल जंगदाळे, अशोक बीडे,बळीराम उडे, वादे, दशरथ गावडे आदीनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात केले आहे

## डॉ. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी युवा नेते यशराज पंडित यांची निवड

गेवराई । प्रतिनिधी

डॉ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी युवा नेते यशराज भैय्या पंडित यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. शुक्रवार ता. १८ रोजी झालेल्या बैठकीत सदरील निवड जाहीर करून, उर्वरित कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.

गेवराई येथील शासकीय विश्रामगृहात दिनांक १८ जुलै २०२५ रोजी डॉ. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीची बैठक घेण्यात आली असून, सर्वानुमते यशराज भैय्या पंडित यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे.



उपाध्यक्ष म्हणून प्रभाकर तात्या पिसाळ, मनोज तात्या हजारे, सचिव शरद नाना मोटे , ज्ञानेश्वर माऊली पवार, पप्पू गायकवाड, सहसचिव अण्णासाहेब राठोड लक्ष्मण चव्हाण, कोषाध्यक्ष उद्धव बापू मडके , सह कोशाअध्यक्ष ॲड. श्रीनिवास ढाकणे, ॲड. आबासाहेब सवाशे, माजी नगरसेवक ,मार्गदर्शक रवींद्र नाना बोराडे ,अरुण मस्के ,कार्याध्यक्ष रणजीत घुंभार्डे, सहकार्याध्यक्ष शिनूभाऊ बेद्रे , डिजिटल मीडिया प्रमुख रवींद्र पवार , संघटक सय्यद एजाज, किशोर वादे , प्रसिद्धी प्रमुख सुभाष सुतार, दिनकर शिंदे ,अमोल वैद्य यांची निवड करण्यात आली असून, मिरवणूक प्रमुख गुफ्रान इनामदार, प्रभाकर भालशंकर, शेख अमजद बब्बू यांना संधी देण्यात आली आहे. सदरील कार्यकारणी सर्वानुमते जाहीर करण्यात आली आहे. या बैठकीला राजाराम कानडे सर, खाजेकर सर, ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडमध्ये एमपीडीए कायद्यांतर्गत मोठी कारवाई : सराईत गुन्हेगाराला स्थानबद्ध करून हसुल कारागृहात रवानगी

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात गुन्हेगारीला पायबंद घालण्यासाठी बीडचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी धडाकेबाज मोहिम छेडली असून, वाळू माफियांसह सराईत गुन्हेगारांवर MPD कायद्यान्वये कारवाया झडत आहेत. या मोहिमेअंतर्गत गुन्ह्यांच्या मालिकेत असलेल्या व शेवगाव तालुक्यातील मुंगी येथील



रहिवासी, सुरज विठ्ठल ढाकणे (वय २७) या वाळू माफियाला स्थानबद्ध करण्यात आले असून, त्याला छत्रपती संभाजीनगरच्या हसुल कारागृहात रवाना करण्यात आले आहे.

सुरज ढाकणे याच्यावर खुनाचा प्रयत्न, दरोडा, जाळपोळ, वाळूचोरी, शासकीय कामात अडथळा, पोलिसांवर हल्ला, धमक्या, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे अशा गंभीर स्वरुपाचे तब्बल ९ गुन्हे दाखल आहेत. स्थानिक लोकांमध्ये त्याची प्रचंड दहशत होती. लोक फिर्याद देण्यासही धजावत नव्हते. त्याच्यावर यापूर्वी CPC ११० अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाईही करण्यात आली होती. मात्र, कारवाईचा धाक न बाळगता त्याने पुन्हा गुन्हेगारीचा मार्ग धरला. त्यामुळे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी 'MPD-' अंतर्गत त्याला कायमची अद्दल घडवण्याचा निर्णय घेतला.

पोलीस निरीक्षक श्री. नारायण एकशिंगे (चकलांबा पोलीस ठाणे) यांच्या मार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे MPDअंतर्गत प्रस्ताव पाठवण्यात आला होता. जिल्हाधिकारी श्री. अविनाश पाठक यांनी प्रस्ताव मान्य करून दिनांक १९ सप्टेंबर २०२४ रोजी सुरज ढाकणे याच्यावर MPD अंतर्गत आदेश काढला. मात्र, आदेश निघाल्यानंतर तो फरार झाला आणि ▶▶ उर्वरित पान २ वर



*महाराष्ट्र अँड गोवा नोटरी वकील संघाच्या बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी अँड राम दहिवाळ यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करताना बीड जिल्हा न्यायालयातील वकील मित्र.छायाचित्र दिसतं आहेत.*

## विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात क्षमता, धैर्य आणि चिकाटी लक्षात घेऊन करिअरची दिशा ठरवावी: एसीपी श्रीकांत डिसले



### विद्यार्थ्यांनी आपला आयडॉल उच्च व्यक्तीमत्वाला मानावे: रमेश पोकळे

बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात क्षमता धैर्य आणि चिकाटी लक्षात घेऊनच आपल्या करिअरची दिशा ठरवावी. त्याबरोबरच त्यांनी नेहमी प्लॅन बी तयार ठेवावा. जेणेकरून प्लॅन ए मध्ये यश मिळत नसेल तर खचून न जाता प्लॅन बी वर काम करून जीवनात यशस्वी होता येईल असे विचार संभाजीनगरचे एसीपी श्रीकांत डिसले यांनी व्यक्त केले. तर विद्यार्थ्यांनी आपला आयडॉल ठरवत असताना. उच्च व्यक्तीमत्व असलेल्या व्यक्तीला आयडॉल मानावे, यामुळे योग्य दिशेने मार्गक्रमन करत यशस्वी बनता येते असे प्रतिपादन रमेश भाऊ पोकळे यांनी केले.

येथील वसंतराव काळे पत्रकारिता आणि संगणकशास्त्र महाविद्यालय, बीड. आणि संभाजीराजे ग्रंथालय आणि व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते मुख्य अतिथी म्हणून श्रीकांत डिसले बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थाअध्यक्ष मा श्री रमेशभाऊ पोकळे होते. यावेळी मा. हिरेनजी केसरिया(सीईओ, वॉरीअर सोल्युशन्स प्रा. लि. पुणे ),मा. गिरीजी साळुंखे (प्रोजेक्ट मॅनेजर व्होक्सवॅगन डिजीटल सोल्युशन्स, जर्मनी), मा. निमिशजी हागे(व्यवस्थापक, प्रोजेक्ट कॉग्निजंट टेक्नॉलॉजी सोल्युशन्स, पुणे ) मा. राहुलजी भालेराव (व्यवस्थापक, ऑपरेशन्स, क्रेडन्स रिसोर्स मॅनेजमेंट, पुणे) मा. गिरीशजी केळकर (संचालक, बी जी एज्युकेशन, पुणे )मा. डॉ. रवींद्रजी खेडकर(कार्यक्रम प्रमुख, डिजिटल मार्केटिंग, एम आय टी एडीटी विद्यापीठ, पुणे ) प्रा गणेश पोकळे (सचिव, कै अण्णासाहेब पाटील ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK